C:\Users\APA\Desktop\APA Backup 1012.2014\APA-2016\Lettter APA -2016.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,

कृषि नगर, वसमत रोड,
परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)

| | | | |
|---|---|---|---|
| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
| वेबसाईट | : mkv2.mah.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा : १. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पृष्ठांकन क्रमांक भाप्रसे १५१५/प्र.क्र.२६०/२०१५/१, दि.३१.१०.२०१५.
२. कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व सेवानिवृत्तीवेतन मंत्रालय, केंद्र शासन यांचे ज्ञापन क्रमांक ११०१३/०८/२०१३-ईएसएसटी (अे)- III, दि.६.६.२०१३
३. कार्मिक, सार्वजनिक तक्रारी व सेवानिवृत्तीवेतन मंत्रालय, केंद्र शासन यांचे ज्ञापन क्रमांक ११०१३/०८/२०१३-ईएसएसटी (अे)- III, दि.३१.८.२०१५.

क्र. अेपीअे-१ दिनांक : ३.२.२०१६

## परिपत्रक

महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांनी संदर्भ क्र.१, २ व ३ अन्वये, सर्व अधिकारी/कर्मचारी यांचा सेवाविषयक प्रश्नांशी /तक्रारींशी निगडीत सर्व पत्रव्यवहार हा योग्य माध्यमाद्वारेच होणे बाबत निर्देश निर्गमित केलेले आहेत. विद्यापीठाकडे, विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांचे सेवाविषयक प्रश्नांशी निगडीत अनेक निवेदने/तक्रारी / सादरीकरण प्राप्त होत असतात. संदर्भाधिन निर्देशांना अनुसरून व विद्यापीठाकडे प्राप्त होणा-या सेवाविषयक तक्रारीबाबत, विद्यापीठ सर्व कार्यालय प्रमुख/ नियंत्रण अधिकारी यांना खालील प्रमाणे निर्देश देत आहे.

विद्यापीठातील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या सेवाविषयक प्रश्नांशी निगडीत तक्रारीबाबत, त्यांच्या त्वरीत वरिष्ठ अधिका-यांशी (Immediate Official Superior) दाद मागणे अपेक्षीत असतांनाही, असे निदर्शनास आले आहे की, अनेक अधिकारी/कर्मचारी हे थेट मा.कुलगुरू अथवा कुलसचिव कार्यालयासोबत पत्रव्यवहार करत असतात.

विद्यापीठातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, त्यांनी आपला सर्व पत्रव्यवहार हा योग्य माध्यमाद्वारेच सादर करावा. योग्य माध्यमाद्वारे प्राप्त न होणा-या निवेदनांची/तक्रारींची तसेच आगाऊ प्रत इत्यादी नमूद करून, सादर करण्यात आलेल्या तक्रारींची दखल घेतली जाणार नाही.

आपले अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी हे आपला पत्रव्यवहार, योग्य माध्यमाद्वारेच सादर करतील या बाबत सर्व कार्यालय प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

सदरील निर्देशांच्या होणा-या उल्लंघणाची दखल ही अतिशय गांभिर्याने घेतली जाईल याची सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

सर्व कार्यालय प्रमुख/नियंत्रण अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले असून, सदरील परिपत्रकाची प्रत मुद्रीत स्वरूपात उपलब्ध (Download) करून घेवून, आपले अधिनस्त असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे.

कुलसचिव